# एक क्षण

**पंकज कुरुलकर**

एक क्षण- लघु कादंबरी

( ek kShaN - novella)

©पंकज कुरुलकर

प्रकाशक

साहित्यसंस्कृती,

४६२६ किंग्ज लँडिंग लेन

केटी, टेक्सास, अमेरिका- ७७४९४

ISBN: 978-1-939830-01-2

मुखपृष्ठ

मयूर कुलकर्णी

संपादन- सोनाली जोशी

मुद्रितशोधन- दिप्ती साळवी

All rights reserved.

No part of this publication may be reproduced, stored in a retrieval system or transmitted, in any physical or electronic form or by any other means, without the prior written permission from the Publisher and the Author.

# एक क्षण

“हॅलो, हेल्पलाईन?”

“येस. मे आय हेल्प यू? मै आपको मदद कर सकती हूँ?”

“हो.” नुकतीच पाच मिनिटांपूर्वी आपल्या खुर्चीवर स्थानापन्न झालेली राणी हँडसेट नीट कानाला लावत बोलू लागली. फ्री होण्याच्या आधीच कॉल सुरू झाले होते. कॉल न घेण्याचा प्रश्नच नव्हता कारण जीवन मरणाचा प्रश्न होता.
“मी काही मिनिटांतच मरणार आहे. मी स्वतः:ला मारून घेतेय. हा माझा अंतिम निर्णय आहे. मी फास तयार केला आहे. फक्त नवरा घराबाहेर पडण्याची वाट बघतेय. तो गेला की मी फास लावून घेईन.”
“मॅडम. आपण आधी बोलायचे का? तुम्ही मला फोन केला आहे म्हणजे तुम्हाला मला काहीतरी सांगायचे असेल. असा निर्णय घाईत घेऊ नका प्लीज. आपण त्याच्यावर मार्ग काढायचा प्रयत्न करूया.”
“सगळे प्रयत्न संपलेत. आय लॉस्ट होप. या सगळयातून सुटकेचा एकच मार्ग दिसतोय तो म्हणजे आत्महत्या. या जगातून नाहीसे होणे एवढेच माझ्या हातात आहे. आणि मी तेच करणार आहे.”
“सगळयातून मार्ग निघतात मॅडम. आपण थोडा धीर धरायला हवा. शेवटी जीवन हे जगण्यासाठी असते. आत्महत्येसाठी नाही.”
“हे प्रवचन मला याक्षणी नको. गेली दहा वर्षे मी खूप सहन केले. आता सहनशक्ती संपली आहे.”
“एवढे घडले तरी काय हे तरी सांगा ना मॅडम. मन मोकळे केले तर बरे वाटेल. मग तुम्ही पाहिजे तो निर्णय घ्या. तुमचे नावही सांगितले नाहीत अजून.”
“पामेला सिन्हा.”

“म्हणजे बिहारच्या आहात?”

“हो. मी धनबादची. मिस्टर आयएएस ऑफिसर आहेत. मुंबई कॅडरचे आहेत. त्यांचे कुटुंब खूप आधीपासून इथे मुंबईत आलेय. ते पाटण्याचे. एवढा चांगला नवरा मिळाला म्हणून घरचे सगळे खूष होते. त्यांनी आयएएसचे सगळे पैसे आमच्याकडून वसूल केले.”

“म्हणजे हुंडा घेतला?”

“आमच्याकडे तो सर्रास घेतला जातो. जेवढा जास्त शिकलेला तेवढा हुंडा जास्त मिळतो. वाटले आयुष्य बनले. भरपूर कॅश, सोने नाणे परत वर बोलेरो गाडी. आता त्यांची वरकमाई तर भरपूर आहे ते वेगळेच.”

“मग चांगलेच आहे की. तुम्हाला ते असे वरकमाईचे पैसे आणतात ते आवडत नाही?”

“मला ह्या घरात “से” कुठे आहे? माझे कोण ऐकते? मी असे हरामाचे

पैसे नको म्हटल्याने ते गप्प राहणार आहेत? मलाच हाकलून देतील.”

“मग ह्यावरून तुमचे वाद होतात? ते अजूनही पैसा मागतात?”

“नाही तसे काही नाही. पैसे हा प्रॉब्लेमच नाही. त्यांच्याकडे पाहिजे तेवढे पैसे आहेत. मी पण शिकलेली आहे. एमकॉम केले आहे.”

“बापरे! वंडरफुल. नोकरी करता?”

“तोच तर प्रॉब्लेम आहे.”

“म्हणजे?”

“घरातून मला कुठे बाहेरच जाऊ देत नाहीत. नोकरी तर खूप दूर राहिली. मुंबईत लग्न होऊन येताना किती स्वप्न बघितली होती. इथे बायका निर्भयपणे फिरतात. नोकरी करतात. लोकलमध्ये जागा मिळत नाही तेव्हा लोंबकळतही जातात. खूप खंबीर असतात. नोकरी करूनही घर सांभाळतात ह्या गोष्टीचे केवढे अप्रूप होते. वाटायचे आपणही तसेच करु या. आईवडीलांनीही त्याच अपेक्षेने एवढे शिकवले. त्यांना वाटायचे लग्न झाल्यावर आपल्या मुलीला पंख लाभतील. ती आभाळात उंच उडेल. त्यांना काय माहिती की मी इथे कैदेत आहे.” समोरून एकदम हुंदका फुटला. राणीसुद्धा काही वेळ गप्पच बसली.

“मॅडम बोलायचे?” काही वेळाने तीच बोलली.

“मला इथे घरातून बाहेर जाऊ दिले जात नाही. हे लोक एकदम कर्मठ आहेत. मी दिवसभर कैदेत असल्याप्रमाणे इथे घरातच बसलेली असते. टीव्ही बघत. स्वयंपाकघरात. सासू सासर्यांबरोबर. ते जणू माझ्या पाळतीवरच असतात. जणू माझी प्रत्येक हालचाल टिपत असतात.”

“म्हणजे? नवरा एवढा शिकलेला आहे ना?”

“तोही तसाच आहे. आईवडीलांच्या ताटाखालचे मांजर आहे. मी त्यांना कधी सांगायला गेले तर माझ्यावरच ओरडतात म्हणतात आई वडिलांविरुद्ध तक्रार करायची नाही. त्यांचे वय झाले

आहे. त्यांना मी दुखावणार नाही. त्यांनी एवढे कष्ट घेऊन मला आयएएस बनवले. ह्या घरात त्यांचाच शब्द फायनल असेल.”

“मग त्यांच्याबरोबरही बाहेर जात नाही?”

“नाही. फक्त सासूसासरे कधी आजारी पडले तर डॉक्टरांकडे घेऊन जाते. मुलांना स्कूलबसला सोडायलाही तेच जातात. दोघांनाही शक्य नसेल तर मी तेवढीच खाली उतरते.”

“हे अजबच आहे?”

“आणि असेच गेल्या दहा वर्षांपासून चालू आहे. त्यात खंड पडलेला नाही.”

“पण कारण काय?”

“त्यांची मुलगी घरातून पळून गेली. तिने मुसलमानाबरोबर लग्न केले तेव्हापासून त्यांनी मुलीशी संबंध तोडले. ते माझ्या लग्नाआधी घडले. म्हणून माझ्यावर निर्बंध आले. ती मुलगी मला अधूनमधून फोन करत असते. पण माझ्या फोनवरही हे लक्ष ठेवून असतात. घरच्या फोनला पॅरलल लाईन आहे. ते लगेच आतल्या खोलीतून उचलून ऐकतात. नवर्याला म्हटले मोबाईल घेऊन दे तर तो म्हणतो तुला कशाला लागतो? त्यामुळे बाहेरच्यांशी मोकळेपणाने बोलताही येत नाही.”

“मग आता कसे बोलता आहात?”

“मी त्यांच्या फोनचे कनेक्शन काढले आहे. त्या दोघांनाही ते कसे लावायचे हे माहिती नाही.”

“तुम्ही कुठे आहात?”

“माझ्या खोलीत. ते त्यांच्या खोलीत आहेत. एव्हाना हे गेले असतील. माझी मरणाची वेळ जवळ आलीय.”

“तुमचा त्रास मला समजू शकतो. पण ही गोष्ट तुमच्या आईवडीलांना कळवली नाहीत? ते ह्यामध्ये काही मदत करू शकतील. ते तुमच्या नवर्याशी किंवा सासूसासऱ्यांशी बोलून मार्ग काढतील.

“त्यांना मी हे सांगण्याचा प्रयत्न केला पण त्यांनी अंग झटकून टाकले. तुझे प्रॉब्लेम तुला सोडवायचे आहेत म्हणाले. त्यांना भिती वाटत असेल की कुठे मुलगी परत येते. त्यांना वाटते माझ्यातच काहीतरी खोटं आहे. मला अगदी एकटं वाटते. आपण खूप बोललो.”

“बोलत राहा मॅडम. तुमच्यासाठी बोलणेच जरुरी आहे.”

“त्याने माझे प्रश्न सुटणार आहेत?”

“माहिती नाही पण बिघडणार तर नाहीत. तुम्हाला मुलं किती आहेत?”

“दोन. जुळे आहेत.”

“अरे वा! फारच छान. किती वर्षाची आहेत?”

“सात. दुसरीमध्ये आहेत. अगदी सारखी दिसतात. एकदम धमाल येते. मलाच ते पटकन ओळखू येतात. सासूसासऱ्यांना  ना तर ते हातोहात गंडवतात. शाळेतही मजा येते. दोघेही मस्तीखोर आहेत. त्यांचे माझ्यावर खूप प्रेम आहे. वडील तर त्यांच्या वाट्याला खूप क्वचित येतात.”

“तेच तर मी म्हणत होते. तुम्ही आत्महत्या केल्यावर त्यांचे कोण बघणार?”

“मी सगळयांची चिंता कशासाठी करत बसू? त्यांचे आजी आजोबा आहेत. वडील आहेत.”

“ते रात्री कोणाजवळ झोपतात?”

“अर्थातच माझ्याजवळ झोपायचे. हल्लीच त्यांना वेगळया खोलीत झोपवण्याचा प्रयोग करतो आहोत पण बर्याच वेळा तो फसतो. दोघे लबाड रात्रीतून उठतात आणि दरवाजा ठोठावतात. हे खूप वैतागतात. पण त्यांना घेण्याशिवाय पर्यायच नसतो.”

“त्यांना वाढताना बघणे हा केवढा आनंद असेल नाही?”

“हो तर. मुलांना चांगल्या रितीने वाढवणे.त्यांच्यावर चांगले संस्कार करणे.एक चांगला माणूस तयार करणे ही मोठी क्रिएटिव्हिटी आहे हे आई बनल्यावर लक्षात आले. त्यांचा रोज अभ्यास घ्यावा लागतो. सकाळी वेळेवर उठवण्यापासून ते शाळेत जाईपर्यंत वेळ कसा जातो हे समजत नाही. दोघांचे वेगवेगळे हट्ट असतात. एकाला उपमा आवडतो तर दुसर्याला शिरा. दोन्ही फर्माइशी एकावेळी पूर्ण कराव्या लागतात. त्रास होतो पण त्यातून आनंदही मिळतो. परवा एकाच्या प्रगतिपुस्तकावर रिमार्क लिहिला होता, मनमिळाऊ, लिडरशीप क्वालिटी असलेला. सगळयांना बरोबर घेऊन चालणारा. ते बघून एवढे छान वाटले की विचारायला नको. पण दुसर्याला असे काही लिहिले नव्हते. त्याला लिहिले होते वंडरफुल अंडरस्टँडिंग अबाउट सब्जेक्ट. तेही केवढे महत्त्वाचे होते. पण तरी तो रुसून बसला की पहिल्यासारखे कॉमेंट्स त्याला का नाहीत. मग समजाऊन सांगत बसावे लागले. ते दोघे घरी असले की त्यांच्यामधेच सगळा वेळ जातो.”

“तुम्हाला आयुष्याकडून काय अपेक्षा आहेत?”

“विशेष काही नाही. मी इतरांसारखी नोकरी करावी. मला मुक्ती हवी आहे. स्वातंत्र्य हवे आहे. मोकळा श्वास हवा आहे. मुलांची मी काळजी घेईनच. पण स्वतः:चे व्यक्तिमत्त्व हवे आहे. हा माझ्यासाठी तुरुंग आहे.”

“मुलांमध्ये तुम्ही आनंद का शोधत नाही?”

“तो आहेच.”

“त्यांना संध्याकाळी खाली खेळायला घेऊन जात जा. तेवढी परवानगी सासू सासरे देतात का बघा. पाहिजे तर सुरुवातीला त्यांनाही घेऊन जा. बरे वाटेल. मोकळा श्वास घेता येईल. घरी एकटया असता.  कुठलाही छंद लावून घ्या.  टीव्ही बघण्यापेक्षा वाचन करा, विणकाम करा, पेंटिंग करा, काही तरी गोष्टीमध्ये स्वतःचा जीव गुंतवा. मग हळूहळू एखाद्या क्लाससाठी बाहेर

जायची परवानगी मिळते का ते बघा. सगळे लगेच मनासारखे घडणार नाही. पण आयुष्यात मनाविरुद्ध खूप गोष्टी घडत असतात. आपण त्याला धैर्याने तोंड दिले पाहिजे. तुमच्या सासुसासऱ्यांचे वय झाले असेल. त्यांचे असे किती आयुष्य असेल? मग मुलांकडे कोण बघणार?”
समोरून पामेला सिन्हाला एकदम हुंदका फुटला.
“एवढे चांगलेपणाने बोलणारेही कोणी कधी भेटले नव्हते. तुम्ही डॉक्टर आहात? सायकॅट्रिस्ट?”
“नाही. ह्या कॉल सेंटरमध्ये काउन्सेलिंगचे काम करते.”
“तुमचे वय काय?”
“बावीस.”
“बापरे! माझ्यापेक्षा बारा वर्षांनी लहान आहात. तरी एवढी समजूत?” खरे म्हणजे मला मरायचे नव्हते पण समोर पर्यायच दिसत नव्हता.”
“असे होते मॅडम. फाशीचा दोर कुठे आहे?”
“साडीचा दोर बनवला होता. पंख्याला लटकवून घेणार होते.”
“त्याची परत साडी करा. ती अंगावरच छान दिसेल.”
“मी तुम्हाला परत फोन करू शकते.”
“जरूर मॅडम. माझे कामच तुम्हाला मदत करण्याचे आहे. कधीही वाईट विचार मनात आला की समोर मुलांचा चेहरा आणा. त्यांची मस्ती, बालिश हट्ट, रडणे आठवा. सगळे नीट होईल. पण मला फोन करत राहा.”
“थँक्यू. पण तुमचे नाव काय?”
“राणी.”
“मला खूप बरे वाटते आहे.”
“पॉझिटिव्ह थिंकिंगला पर्यायच नसतो मॅडम.”
“मी फोन ठेवते. परत करेन. यू बीकम माय फ़्रेंड.”
“येस मॅडम.”
सुटकेचा निःश्वास सोडत राणीने फोन ठेवला तेवढ्यात परत फोन वाजला.

“गुडमॉर्निंग सर.” पलीकडून पुरुष होता.
“माय मॉर्निंग इज नॉट गुड. आय ऍम अबाउट टू सुसाईड.”
“होल्ड ऑन सर. आपण आधी बोलूया. तुमचे मन मोकळे करा. मनात काहीही ठेवू नका. सगळी भडास माझ्यावर काढा. पण आत्महत्येचा विचार काही क्षण बाजूला ठेवा. जगणे आणि मरण्यात एका क्षणाचे अंतर असते. एकदा आपण मेलो की संपले. परत या जगात येता येत नाही. एक चूक कायमची महाग ठरू शकते. आयुष्यच संपते. त्याआधी शांतपणे विचार करू.”
“मी हा विचार आज करत नाहीय. कधीचा करतोय. शेवटी ह्या निर्णयाला आलो. मला समोर डेड एंड दिसतोय. मी गेले पाच वर्षे खूप खटपट लटपट करतोय. सर्व तर्हेचे प्रयत्न करून झाले. पण प्रत्येक गोष्टीमध्ये अपयशच येतेय. माझाच माझ्यावर विश्वास बसत नाही. एके काळी मी हात लावेन तेथे सोने व्हायचे. मी करोडपती होतो. मी सर्व प्रोजेक्ट यशस्वी करायचो. पण आता दिवसच बदलले. कोणी तरी करणी केली असावी. किंवा सटवीचा फेरा असेल. मी या गोष्टींवर अजिबात विश्वास ठेवायचो नाही. बायको म्हणाली बाबा-बुवा-मातांकडे जाऊया. त्र्यंबकेश्वरला जाऊन नागबळी देऊ. मी त्यापैकी काहीच मानले नाही. मी पक्का नास्तिक होतो. आता काय आहे हेच मला समजत नाही.”
“एवढे घडले तरी काय सर? तुम्ही मला तुमचे नावही सांगितले नाही.”
“त्याने काय फरक पडतो? हा आपल्या समाजात भयंकर प्रकार आहे. आडनाव विचारायचे. त्यावरून जात ओळखायची. ओळखता आली नाही तर कुठल्या गावचे विचारायचे. त्यावरून अंदाज घ्यायचा. त्यावरून तो आपल्या जवळचा का दूरचा हे ठरवायचे. जातीवरून माणसाची पारख करायची. धर्मावरून आपला - तुपला ठरवायचे. मग माणूस मदतीच्या लायकीचा आहे का नाही ठरवायचे. पूर्वी महाराष्ट्रात समाजवादी होते तेव्हा थोडी तरी बरी अवस्था होती. ते संपले आणि पुरोगामित्वही संपले. आता माणसांना फक्त वाटत राहा.”
“सर चुकले. खरोखर चुकले. तुमच्या भावना एवढा प्रखर असतील असे वाटले नव्हते. आमच्यासाठी जात धर्म प्रांत यापैकी काहीही महत्त्वाचे नसते. आमचे ईमान एकच असते. समोरच्या व्यक्तीचे प्राण वाचवायचे.”

“ते कशासाठी करायचे? जगाची लोकसंख्या सात कोटी झालीय. परवाच कुठेतरी वाचले की भारतात दरवर्षी एक लाख सत्तर हजार लोक आत्महत्या करतात. त्याने कुठे लोकसंख्या कमी होतेय? ज्यांना मरायचे आहे त्यांना खुशाल मरू द्यावे. मग तुम्ही हे कॉल सेंटर कशासाठी उघडून बसलात?”

“सर प्रत्येक सजीवाचा जीव महत्त्वाचा आहे. तो वाचवणे आपले कर्तव्यच आहे.”

“तो वाचवून करायचे काय? खायला काळ आणि भुईला भार. मी सध्या तसाच झालोय. बांडगुळासारखे बायकोच्या जीवावर जगतोय. एवढे वर्ष ती माझ्या पैशांवर मजा करत होती. दोघांनी मिळून खूप मजा केली. जग फिरलो. न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया, युरोप, अमेरिका, आफ्रिकेचे जंगल, वेस्ट इंडीजची बेटं काही म्हणून सोडले नाही. पंधरा वर्षात वर्षातून किमान एकदा तरी बाहेर जायचो. फाईव्ह स्टारमधे राहायचो. रग्गड शॉपिंग करायचो. घर सगळे जगभरच्या वस्तूंनी भरून गेलेय. पण गेल्या पाच वर्षात कुठेही बाहेर गेलो नाही. पैसेच संपले. असा फटका खाल्ला की उठताच येणार नाही. होत्याचे नव्हतो झालो.”

“नाव सांगितले नाही तरी काय करायचात हे तरी सांगू शकलात तर बरे होईल सर.”

“तुम्ही माझे व्यवसायात डुबलेले पैसे मिळवून देणार आहेत? एवढा यशस्वी बिझनेसमन. मोठा अभिमानाने सांगायचो. बिझनेस माझ्या टेबलावर येतो. मी कस्टमरकडे जात नाही. माउथ टू माउथ पब्लिसिटी होते आणि मला बिझनेस मिळतो. आता एक जण बिझनेस देत नाही.”

“कॉन्ट्रॅक्ट मॅन्युफॅक्चरिंग करत होतो. बाटल्यांचे सील बनवण्याचे. नावाला कस्टमर खूप होते. पण

सर्वात मोठा क्लाएंट एकच होता. मल्टीनॅशनल कंपनी होती. फॉर्च्युन 500 पैकी एक. एवढे वर्ष मजेत चालले होते. मजबूत पैसे कमावत होतो. एका कस्टमरवर अवलंबून राहायला नको हे कळत होते. पण त्या तोडीचा कस्टमर प्रयत्न करूनही मिळत नव्हता. एक दिवस ह्या कस्टमरने मला बिझनेस द्यायचा बंद करायचे ठरवले. कारण काहीही नव्हते. माझ्या कामात कसलीही खोट नव्हती. तेही माझ्यावर खूष होते पण त्यांनी स्ट्रॅटेजिक निर्णय घेतला होता की हे मॅन्युफॅक्चरिंग त्यांनी स्वतः:च करायचे. हा निर्णय यूएसवरून झाला होता. त्यामुळे इथलेही अधिकारी हतबल होते. त्यांच्या जीवावर मी फॅक्टरीमध्ये पाचशे वर्कर ठेवले होते. एवढा मोठा पसारा वाढवून ठेवला होता. सगळाच इस्कोट व्हायची वेळ आली. खूप प्रयत्न करून बघितला पण काही झाले नाही. कॉन्ट्रॅक्ट गेलेच. चारशेपेक्षा जास्त लोकांना एका रात्रीमध्ये काढावे लागले. त्यांना नुकसान भरपाई द्यावी लागली. एकदम होत्याचे नव्हते होऊन गेले. त्यांच्या जीवावर फॅक्टरी वाढवली होती. फ्लॅट एकदम सॉफिस्टीकेटेड केला होता. मीनारी जर्मनीमधून आयात केली होती. त्यासाठी कर्ज घेतले होते. या कंपनीचे कॉन्ट्रॅक्ट असेपर्यंत मजेत फेडत होतो. आता ते एकदम असह्य झाले. इतर कस्टमर्सना एवढी सॉफिस्टीकेटेड टेक्नॉलॉजी नकोच होती. ते तेवढे रेट द्यायला तयार नव्हते. सगळेच बिघडून गेले. व्याज आणि कर्ज दोन्ही कसे द्यायचे ह्याचे

प्रश्न पडू लागले. एकेक ऑफिस विकू लागलो. उरलेल्या शंभर लोकांना पोसणेही अवघड होऊ लागले. मग मीनारी मिळेल त्या किमतीला विकावी लागली. पर्यायच उरला नव्हता. दरम्यान इतर काही बिझनेस करता येतो का हे अजमावून बघत होतो पण नशिबच रुसले होते. कुठलाच बिझनेस जमत नव्हता. शेवटी फॅक्टरीही विकली. प्रत्येक ऍसेट विकण्याबरोबर आतून उन्मळून पडत होतो. अस्वस्थ होत होतो. आधी या इंडस्ट्रीत राजा होतो. आता ज्यांना पैसे वेळेवर दिले गेले नव्हते ते लोक माझ्यावर केस करायच्या गोष्टी बोलू लागले. याच लोकांना मी देत असलेल्या बिझनेसमुळे मार्केटमध्ये स्टँडींग मिळाले होते. कोणी आपले नसते फक्त पैसे आपले असतात ह्याची जाणीव होऊ लागली. जेथे फुले वेचली तेथे गोवर्या वेचण्याची वेळ आली होती. यामध्ये माझी चूक काय हेच समजत नव्हते. एवढी कठोर शिक्षा मला का व्हावी ह्याचे आकलन होत नव्हते. मी कर्जमुक्त झालो खरे पण जवळ कुठलाही बिझनेस करण्यासाठी पैसाच उरला नव्हता. जे कमावले ते गमवले होते. माझे एकेक नातेवाईकही माझी अवस्था बघून दूर जाऊ लागले होते. बायकोमुलाकडूनही टोचून बोलले जाऊ लागले. ज्यांच्याकडून सपोर्टची अपेक्षा होती तेच अपमानास्पद भाषा बोलू लागले. एवढी वर्षे ते माझ्याच पैशांवर मजा करत होते हे ते सोयिस्करपणे विसरून गेले होते. आपण अगदी एकटे आहोत ह्याची जाणीव मनाला विदीर्ण करत होती. आपण जगायचे कशासाठी आणि कोणासाठी हेच समजत नव्हते. पैसे असताना स्वरक्षणासाठी रिवॉल्वर विकत घेऊन ठेवले होते ते आता पैसे नसताना कामाला येणार असे दिसते आहे.”

“होल्ड ऑन! होल्ड ऑन!! एवढी घाई करू नका. माणूस हा प्राणी असाच स्वार्थी, मतलबी असतो हे मान्य. आपण एकटेच या जगात आलो आणि एकटेच जाणार आहोत हेही मान्य. येताना काही आणले नव्हते व जाताना काही नेणार नाही आहोत हेही खरे मग गेलेल्या संपत्तीसाठी एवढे दु:ख कशासाठी करायचे? आपण एकटेच होतो आणि आहोत. आपल्याला स्वतः:साठीच जगायचे आहे ही जाणीव का ठेवत नाही? अपयशी होऊन कशासाठी मरायचे? परत यशस्वी होऊ आणि मग हेच लोक कसे भुंग्यासारखे परत जमतात हे बघण्यात कशी मजा आहे ह्यासाठी का नाही जगायचे? जेव्हा संपत्ती, पैसा येत होते तेव्हा तुम्ही कुठे प्रश्न विचारला की हे माझ्याकडेच एवढे का येताहेत?

मग आता ते गेले तर त्याचा एवढा शोक कशासाठी की आपण आयुष्यच संपवून टाकावे?

स्वतः:च्या हिमतीवर एवढा बिझनेस उभा केला होता आणि आता हिंमत संपली? हे काही खरे नाही.”

“तुमचे नाव काय?”

“त्याच्याशी काय मतलब?”

“तुमचे वय काय?”